01 AUG 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बिगर शासकीय संस्थांनी कार्याभिमुखता वाढवावी

## डॉ. डी. टी. शिर्के : विद्यापीठात बिगर शासकीय संस्था विकास व्यवस्थापन प्रशिक्षण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : बिगर शासकीय संस्थांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठा इतिहास असून, संबंध जीवसृष्टीच्या कल्याणामध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. कार्याभिमुख व पारदर्शक संस्थांचा इतिहास, वर्तमान चांगला असून, अशा संस्थांचे भविष्यही देदीप्यमान असणार आहे. तेव्हा बिगर शासकीय संस्थांनी आपली कार्याभिमुखता, पारदर्शकता वाढवावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बिगर शासकीय संस्था विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी तुषार कामत, शिवराज नाईकवडे, एस. एस. महाजन, अविनाश भाले आदी.

विद्यापीठात डोटीसस्टार बिझनेस सोलुशन्स आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे आयोजित बिगर शासकीय संस्था विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. एस. एस. महाजन होते.

कुलगुरू म्हणाले, 'बिगर शासकीय संस्थांना अर्थसाहाय्य देणारे व घेणारे या दोहोंतील संबंध पारदर्शक असावेत, या संस्थांनी केलेली कामे व त्यांनी त्यासाठी वापरलेला निधी हा सार्वजनिकरीत्या सर्वांसाठी उपलब्ध हवा.' डॉ. महाजन म्हणाले, 'बिगर शासकीय संस्थांनी केवळ नफ्याचा हिशोब न ठेवता आपल्याला कशाप्रकारे तोटा सहन करावा लागत आहे, याचेही परीक्षण करावे. संस्थांच्या हिशोबामध्ये पारदर्शकता असावी.' अविनाश भाले, धीरज जाधव, बिरेन धरमसी, सुरेश विटेकर, शरद अजगेकर यांनी मार्गदर्शन केले. धर्मादाय आयुक्तालयाचे अधीक्षक नायकवडे, डोटीसस्टार बिझनेस सोलुशन्सचे तुषार कामत उपस्थित होते. शरद पाटील, डॉ. किशोर खिलारे, अविनाश वाघमारे, विदिमा कामत, अनुरुद्ध पाटील, शैलेश बांदेकर, विक्रम कांबळे यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 AUG 2024
लोकमत

# संस्थांनी पारदर्शकता वाढवावी : कुलगुरू

कोल्हापूर : जीवसृष्टीच्या कल्याणासाठी बिगरशासकीय संस्थांनी आपली कार्याभिमुखता व पारदर्शकता वाढविली पाहिजे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. डोटीसस्टार बिझनेस सोल्युशन्स कंपनीच्या सहयोगाने सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या वतीने आयोजित बिगरशासकीय संस्था विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रा. डॉ. एस. एस. महाजन अध्यक्षस्थानी होते.

धर्मादाय अधीक्षक शिवराज नायकवडे व डोटीसस्टार बिझनेस सोल्युशन्सचे तुषार कामत हे प्रमुख पाहुणे होते. अविनाश भाले यांनी स्वागत केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष

01 AUG 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्यादेवींकडून देश उभारणीत मोठे योगदान : डॉ. पवार

## डॉ. प्रकाश पवार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रागतिक, सुधारणावादी आणि चिकित्सक दृष्टिकोनातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी राजकारण आणि समाजकारणाला विशेष आकार दिला. शेतकऱ्यांना शेतीमध्ये आणि स्त्रियांना वस्त्रोद्योगामध्ये प्रोत्साहन देऊन रयतेची काळजी वाहिली. पुढे तोच उद्योग जगभर विकसित झाला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त इतिहास अधिविभागाच्या सभागृहामध्ये 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : जीवन आणि कार्य' या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांची विशेष उपस्थिती होती. डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता राजमाने यांनी सूत्रसंचालन केले, तर दत्ता टिपुगडे यांनी आभार मानले. यावेळी बबनराव रानगे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. नीलांबरी जगताप यांच्यासह संशोधक, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

01 AUG 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अवकाश संशोधनात कोल्हापूर अग्रेसर

## तेहतीस वर्षांतील उल्लेखनीय प्रवास : जगभरातील संस्थांमध्ये महत्त्वाचे स्थान

**संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : अहमदाबाद येथील फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीमधून निवृत्तीनंतर ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांनी शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून कोल्हापुरात अवकाश संशोधनाची सुरुवात केली. त्याला डॉ. ए. के. शर्मा, विजया पुरी, राजीव व्हटकर आदी अभ्यासक, शास्त्रज्ञांनी गती दिली. त्याच्या जोरावर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील अवकाश संशोधनामध्ये कोल्हापूरने महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. सूर्यावर होणाऱ्या घडामोडी, आयनोस्फेर्स, भू-चुंबकीय क्षेत्रावरील परिणाम आदींचा अभ्यास, संशोधन येथे सुरू आहे. नासा, ईसा, इस्त्रो या संस्थांकडील माहितीचे विश्लेषणही केले जाते.

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. भोसले यांनी मूळ गाव असलेल्या कोल्हापुरात राहून अवकाश संशोधन रुजविण्याचे जोमाने काम केले. विद्यापीठात स्पेस फिजिक्स अभ्यासक्रम, पन्हाळगडावर अवकाश संशोधन केंद्र सुरू केले. पृथ्वीच्या चाळीस किमीवरील वातावरणाच्या अभ्यासासाठी आयआयजी मुंबईसमवेत सामंजस्य करार करून आयनोसोन्डे, पार्शल रिफ्लेटिंग रडारआदी उपकरणे विद्यापीठात बसविली. विद्यापीठात अवकाश संशोधन विशेष अभ्यासक्रम सुरू करत सूर्यावरील घडामोडींचे अभ्यासक डॉ. ए. के. शर्मा यांची शिक्षक म्हणून नियुक्ती केली. त्यांनी डॉ. भोसले यांचे कार्य पुढे नेले. कोयना धरण क्षेत्रातील भूकंपाची तीव्रता, अंदाजासाठी लघु रेडिओ लहरी नोंदविण्यासाठीचे 'लेमी' उपकरण राजाराम तलाव परिसरात, तर इस्त्रोच्या सहकार्यातून अवकाश संशोधन केंद्रामध्ये 'आयआरएनएसएस' उपकरण बसविले. तेथे बारा इंची टेलिस्कोप, एमएफ रडार, आदी अद्ययावत उपकरणे आहेत. सध्या या केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर आहेत.



अद्ययावत उपकरणांमुळे अवकाश संशोधन वाढले आहे.



नाईट एअरग्लोच्या अभ्यासासाठी वापरले जाणारे ऑलस्काय इमेजर.

### संशोधनाला गती देणारे शास्त्रज्ञ, अभ्यासक

कोल्हापुरातील अवकाश संशोधनाला गती देण्यात विविध शास्त्रज्ञ, अभ्यासकांचा समावेश आहे. त्यात प्रा. गिरिजा राजाराम (आयआयजी मुंबई) यांनी विद्यापीठाला रिओमीटर उपकरण दिले. प्रा. जी. के. मुखर्जी, प्रा. गुरुबरण, वर्धमान युनिव्हर्सिटीचे प्रा. आनंदे बोस, फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीचे आर. पी. सिंग, पल्लमराजू, प्रमोद सूर्यवंशी आदींचा समावेश आहे. त्यांनी संशोधनविषयक विविध प्रयोग करून विद्यार्थ्यांना अधिकचे मार्गदर्शन केले आहे. विद्यापीठातून शिक्षण घेतलेले डॉ. ओंकार गुरव (शिरोळ), दादा नाडे (कुंभोज), अमोल पाटील, माणिक रोकडे (बत्तीस शिराळा), सुप्रिया कांबळे (कागल), नागेश कोठावळे (हातकणंगले) हे अवकाशासंबंधित विषयांवर संशोधन करीत आहेत.

### 'चांद्रयान-३' च्या डाटावर संशोधन करणार

अवकाश संशोधनात कोल्हापूरची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जात आहे. गेल्या ३३ वर्षांतील या क्षेत्रातील वाटचाल उल्लेखनीय आहे. नासा, ईसा, इस्त्रो या संस्थांकडील डाटावर आपले विद्यार्थी काम करत आहेत. आदित्य एल-वन उपग्रहाने चांद्रयान-३ मोहिमेअंतर्गत संकलित केलेला डाटा उपलब्ध झाल्यावर त्याबाबतही संशोधन केले जाणार असल्याचे विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी सांगितले.

### म्हणून कोल्हापूरला विशेष महत्त्व

भौगोलिकदृष्ट्या पाहता कोल्हापूर विषुववृत्ताजवळ असून, त्याचा इलेक्ट्रोजेट जिल्ह्यातून जातो. त्याचे अवकाश संशोधन करण्यामध्ये त्याचे विशेष महत्त्व आहे. त्यामुळे अवकाश संशोधन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध संस्था याठिकाणी त्यांची उपकरणे बसवत आहेत. इस्त्रो, नासा, ईसा या संस्था त्यांच्याकडील काही माहिती (डाटा) ऑनलाईन स्वरूपात विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन कार्यासाठी उपलब्ध करून देतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 1 AUG 2024
तरुण भारत

# प्रेमचंद यांचे साहित्य मानवाला दिशा देणारे : तृप्ती करेकट्टी

कोल्हापूर : हिंदीचे प्रसिद्ध लेखक मुंशी प्रेमचंद यांनी साहित्याच्या माध्यमातून तत्कालीन समाजाचे वास्तववादी चित्रण केले. जे आजही विश्व स्तरावर समस्त मानव जीवनाला दिशा देण्याचे काम करते, असे मत हिंदी विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये मुंशी प्रेमचंद यांच्या १४४ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. प्रेमचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. रमेश खबाले यांनी केले. आभार डॉ. अक्षय भोसले यांनी मानले. सूत्रसंचालन श्रावणी चिपळूणकर हिने केले.

यावेळी इंग्रजी डॉ. ए. एस सरवदे,डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. दीपक भादले, डॉ. सुरेंद्र उपरे, डॉ.प्रकाश मुंज, डॉ. संतोष कोळेकर, प्रा. प्रकाश निकम, डॉ. जयसिंग कांबळे,डॉ. सुषमा चौगले, प्रा. अनिल मकर, डॉ. सुवर्णा गावडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 AUG 2024
लोकमत

# हिंदी विभागात प्रेमचंद यांची जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : हिंदीचे प्रसिद्ध लेखक मुन्शी प्रेमचंद यांनी साहित्याच्या माध्यमातून तत्कालीन समाजाचे वास्तववादी चित्रण केले. जे आजही विश्वस्तरावर समस्त मानव जीवनाला दिशा देण्याचे काम करते, असे प्रतिपादन हिंदी विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी बुधवारी केले. विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये मुन्शी प्रेमचंद यांच्या १४४ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या.

इंग्रजी विभागाचे डॉ. ए. एम. सरवदे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. दीपक भादले, डॉ. सुरेंद्र उपरे उपस्थित होते. डॉ. प्रकाश मुंज, डॉ. संतोष कोळेकर, प्रा. प्रकाश निकम, डॉ. जयसिंग कांबळे, मेघा तोडकर, शीतल खैरमोडे यांनी विचार व्यक्त केले. डॉ. रमेश खबाले यांनी प्रास्ताविक श्रावणी चिपळूणकर हिने सूत्रसंचालन केले. डॉ. अक्षय भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 AUG 2024
लोकमत

# गणित अधिविभागात रक्तदान शिबिर

कोल्हापूर : विद्यापीठातील गणित अधिविभाग व आरोग्य केंद्र, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय यांच्यावतीने गणित अधिविभागात आयोजित रक्तदान शिबिरात ३४ विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी रक्तदान केले. यावेळी डॉ. एस. एस. कुंभार, एस. डी. थिटे, डॉ. सुप्रिया लोखंडे, डॉ. जान्हवी चव्हाण, दत्तात्रय ऐवळे, मन्सूर बारगीर, जयवंत कदम, ओंकार देसाई, यश गायकवाड, राहुल धनवडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 AUG 2024

पुढारी

# शिबिराला प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ गणित अधिविभाग व आरोग्य केंद्र, कोल्हापूर आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गणित अधिविभागात रक्तदान शिबिर आयोजित केले होते.

यावेळी विविध अधिविभागातील ३४ विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी रक्तदान केले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एच. ठकार, वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे, डॉ. एस. एस. कुंभार, एस. डी. थिटे यांनी या शिबिराचे आयोजन केले होते.

01 AUG 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या रोपवाटिकेतून निसर्गाचे संवर्धन!


## दरवर्षी ३० हजार रोपांची निर्मिती; लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गेल्या दहा वर्षांपासून शिवाजी विद्यापीठाच्या रोपवाटिकेतून निसर्गाचे संवर्धन सुरू आहे. नागरिकांना माफक दरात देशी व इतर झाडांच्या रोपांची विक्री केली जात आहे. दरवर्षी ३० हजार रोपांच्या निर्मितीमधून लाखो रुपयांची उलाढाल होत आहे.

विद्यापीठाचा परिसर सुमारे ८५३ एकर जागेत पसरलेला आहे. २०१४ मध्ये विद्यापीठात नर्सरी सुरू करण्यात आली. नर्सरीत जातिवंत देशी रोपाची, कलमाची व बियाणाची उत्पत्ती, रोपाचे शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन व संवर्धन केले जात आहे. नर्सरीत जंगली झाडे याबरोबर शोभिवंत झाडांची रोपे तयार केली जातात. आंबा, जांभूळ, वड, फणस, बहावा, चिंच, कांचन, पेरूची रोपे बियांपासून तयार केली जातात. शोभिवंत झाडांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या इनडोअर व आऊटडोअरचा प्रामुख्याने समावेश आहे. अकालिफा, ड्रासिना, क्रोटोन, ब्लू तगार, रजनी, गोल्डन कोडिया, सदाफुली, पारिजातक, गुलाब ही झुडूपवर्गीय तर मधुमालती, गोकर्ण, मॉर्निंग ग्लोरी, कुंदा, संक्रांत वेल, लसूण वेल या जमिनीलगत वाढणाऱ्या झाडांची रोपे तयार केली जातात. त्याचबरोबर ब्राम्ही, इन्सुलिन प्लँट, आडुळसा, गुळवेल, पानफुटी, हाडजोड, वेखंड, वाळा, काळी निरगुडी, लेमन ग्रास या औषधी वनस्पतींची रोपेदेखील तयार केली जातात. देशी-विदेशी असे मिळून १५० प्रकारचे गुलाब रोपे तयार केली जात आहेत. याचे लवकरच वर्गीकरण केले जाणार आहे. विद्यापीठाच्या नर्सरीत अपुरे मनुष्यबळ असल्याने 'कमवा आणि शिका' योजनेतील विद्यार्थ्यांची मदत घेतली जाते.

यात रोपांच्या पिशव्या भरणे, तण काढणे आदी छोटी-मोठी कामे विद्यार्थी करतात. नर्सरीतून वर्षाला ३० हजार झाडांची रोपे तयार केली जातात. नागरिकांना १५ ते ५५ रुपयांमध्ये विक्री केले जाते. यातून वर्षाला दोन लाखांचे उत्पन्न मिळते.



### यंदापासून व्यावसायिक तत्त्वावर नर्सरी सुरू होणार

शिवाजी विद्यापीठ यावर्षापासून व्यावसायिक तत्त्वावर एक ते दोन एकर जागेत नवीन नर्सरी सुरू करणार आहे. याच्या माध्यमातून १ लाख रोपे दरवर्षी तयार केली जाणार आहेत. यात देशी-विदेशी झाडे, दुर्मीळ वनस्पतीसह सर्व प्रकारच्या शोभिवंत झाडांची रोपे असणार आहेत. यातून विद्यापीठास लाखो रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.

> "वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन ही अत्यंत महत्त्वाची बाब बनली आहे. त्यासाठी जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त ठरणारी झाडे लागवड करता यावीत, यासाठी शिवाजी विद्यापीठाची नर्सरी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पूर्वी रोपवाटिका मर्यादित स्वरुपात होती. आता आधुनिक तंत्रयुक्त रोपवाटिका तयार करण्यात येत आहे.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

01 AUG 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुरात अडकलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ आता स्वतंत्र परीक्षा घेणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पुराच्या पाण्यामुळे स्थगित करण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या मार्च- एप्रिल २०२४ च्या परीक्षा आज गुरुवारपासून सुरू होणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना पूरस्थितीमुळे या परीक्षा देता येणार नाहीत अशा विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयास कळविल्यास अशा विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठात आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात गत आठवड्यापासून पूरस्थिती निर्माण झाल्याने बी.टेक, आर्किटेक्चर, विधी व फार्मसी या विषयांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. आता पूरस्थिती नियंत्रणात आल्याने स्थगित करण्यात आलेल्या परीक्षा आज गुरुवारपासून घेण्यात येणार आहेत. मात्र, अद्यापही काही भागातील मार्ग बंद असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर जाता येत नाही, असे चित्र आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयास कळवणे आवश्यक आहे. पूरस्थितीत अडकलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठात घेण्यात येणार आहे.

## आज २४ विषयांची पुनर्प्रवेश परीक्षा

विद्यापीठात आज २४ विषयांची पुनर्प्रवेश परीक्षा पाच वेगवेगळ्या वेळेत होणार आहे. यामध्ये एम. एस्सी.बॉटनी, एम.एस्स.नॅनोसायन्स, एम.एस्सी. झुलॉजी यांसह २४ विषयांच्या परीक्षा सकाळी १०:३० ते दुपारी १२, दुपारी १२:३० ते दुपारी २, दुपारी २:३० ते सायंकाळी ४, दुपारी ३ ते सायंकाळी ६, ४:३० ते सायंकाळी ६ अशा पाच टप्प्यात ही परीक्षा होईल.

01 AUG 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या आजपासून परीक्षा

कोल्हापूर, ता. ३१ : पूरस्थितीमुळे शिवाजी विद्यापीठाने स्थगित केलेल्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा उद्या, गुरुवारपासून होणार आहेत. त्यात बी. टेक., आर्किटेक्चर, विधी (लॉ) आणि फार्मसी अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे.

पावसाने उघडीप दिल्याने आणि वाहतुकीचे मार्ग खुले झाल्याने विद्यापीठातर्फे या परीक्षा गुरुवारपासून घेतल्या जाणार आहेत. त्यात विविध २४ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचा देखील समावेश आहे. दरम्यान, या पूरपरिस्थितीमुळे काही विद्यार्थ्यांना परीक्षा देता येणार नाही. त्याबाबत तत्काळ महाविद्यालयांना कळवावे. या विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती महाविद्यालयांनी त्यांना परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिलेल्या गुगल लिंकवर भरावी. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयातर्फे प्राप्त होईल, अशाच विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जातील, अशी माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 AUG 2024

पुढारी

# विद्यापीठाच्या स्थगित परीक्षा आजपासून सुरू होणार

कोल्हापूर : जिल्ह्यातील पूरस्थितीमुळे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने स्थगित करण्यात आलेल्या परीक्षा दि. १ ऑगस्टपासून घेण्यात येणार आहेत, असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने परिपत्रकाद्वारे कळवले आहे. या पत्रकात म्हटले आहे की, मार्च, एप्रिल २०२४ च्या सत्रातील दि. २२ जुलै २०२४ पासूनच्या विविध अभ्यासक्रमांच्या (बी. टेक. आर्किटेक्चर, विधी, फार्मसी) परीक्षा शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये उद्‌भवलेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर स्थगित करण्यात आलेल्या होत्या. सद्यस्थितीत पूरस्थितीमध्ये सतत चढ-उतार होत आहे; पण बहुतांश विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक व रोजगाराच्या संधी हुकण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थगित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. १ ऑगस्टपासून सुरू घेण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 1 AUG 2024
तरुण भारत

# स्थगित परीक्षा आजपासून, वेळापत्रक जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात मुसळधार पाऊस पडल्याने पुर आला होता. त्यामुळे २२ ते ३१ जुलैपर्यंतच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. या परीक्षा १ ऑगस्टपासून होणार आहेत. स्थगित केलेल्या परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. परीक्षा वारंवार स्थगित केल्याने विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणावर व नोकरीच्या संधीवर परिणाम होवू शकतो. त्यामुळे परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

परंतू अद्यापही खरोखच एखाद्या भागात पूरस्थिती आहे, या पुरामुळे जे विद्यार्थी परीक्षेला बसू शकणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला माहिती द्यावयाची आहे. महाविद्यालयाने विद्यापीठाच्या https://forms.gle/58keFiJ7GVmk13q5vpR7 या लिंकवर संबंधीत विद्यार्थ्यांची माहिती भरावयाची आहे. माहितीप्राप्त विद्यार्थ्यांची यथावकाश विद्यापीठात परीक्षा घेतली जाणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 AUG 2024 पुढारी

# बंडखोर साहित्यिक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे

वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला सिद्धहस्त कादंबरीकार, लोकनाट्यकार, ग्रामीण ढंगातील रांगड्या तमाशाला 'लोकनाट्य' हे ब्रीद देणारा, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्याद्वारे जनजागृतीसाठी प्रयत्न करणारा, वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारा लोकशाहीर आणि बंडखोर लेखक म्हणून अण्णा भाऊ साठे यांचेच नाव अग्रणी म्हणून घ्यावे लागेल. आज त्यांच्या जयंतीनिमित्त...

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी मातंग कुटुंबात जन्म झाला. आई-वडिलांच्या आग्रहामुळेच वयाच्या १४ व्या वर्षी अण्णांनी प्राथमिक शिक्षणाला सुरुवात केली; परंतु तत्कालीन मागास जातीतील मुलांसाठी त्या काळी वेगळ्या शाळा होत्या. जंगलात एकटे भटकणे, पोहणे, मासेमारी, शिकार करणे, विविध पक्ष्यांशी मैत्री करणे, जंगलातील पाना-फुलांमधील सूक्ष्म फरक शोधणे, असे एक ना अनेक छंद त्यांना होते. रेवन्याच्या जत्रेत त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले. त्याचा परिणाम अण्णा भाऊंवर झाला आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊ लागले. अण्णांनी वैजयंता, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वारणेचा वाघ, फकिरा अशा अनेक कादंबऱ्या लिहिल्या. ३०० च्या वर कथा लिहिल्या. खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, कृष्णाकाठच्या कथा असे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी स्टॅलिनग्राडचा पोवाडा, महाराष्ट्राची परंपरा, मुंबईचा कामगार असे पोवाडे लिहिले. अण्णा भाऊंच्या साहित्याचे हिंदी, गुजराती, उडीया, बंगाली, तामीळ, मल्ल्याळी या भारतीय भाषांबरोबरच रशियन, झेक, पोलिश, इंग्रजी, फ्रेंच अशा जगातील २७ भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. लेखणीचे हत्यार बनवून त्यांनी पुरोगामी, विज्ञाननिष्ठ स्त्रीवादी, लढाऊ आविष्काराचा दीपस्तंभ मराठी साहित्याच्या क्षेत्रात उभा केला.

**– उत्तम सकट,**
उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

01 AUG 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रासंगिक

# आता वळू नका, रणि पळू नका, कुणी चळू नका...

**सामान्यांचे प्रश्न अधांतरी ठेवणाऱ्या या छळणाऱ्या काळात चळवळींचा झपाट्याने संकोच होत असताना या प्रज्ञावंतांची पुनर्भेट अत्यावश्यकच आहे!**

डॉ. रणधीर शिंदे



शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**अण्णा भाऊ साठे** यांचे जन्मशताब्दी वर्ष संपून नुकतीच दोन वर्षे झाली आहेत. सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या आडवळणाच्या गावी जन्मलेल्या अण्णा भाऊंनी महाराष्ट्राच्या समाजकारणात आणि राजकारणात हिरिरीने सहभाग घेतला. संयुक्त महाराष्ट्रासह स्वातंत्र्यानंतरच्या कष्टकऱ्यांच्या अनेक आंदोलनात अण्णा भाऊ आघाडीवर राहिले. त्यांनी कलापथकांचे नेतृत्व केले. आपल्या बुलंद पहाडी आवाजाने लोकजागृतीचे स्फुल्लिंग चेतविले. मुंबईच्या झुंजार कामगार जीवनाने आपल्याला घडवले आहे याची नम्र भावना त्यांच्या मनात होती.

अण्णा भाऊंचा संवेदनशील स्वभाव व विचारदृष्टी घडविण्यात मुंबई शहराचा मोठा वाटा आहे. त्यांनी कथा, कादंबऱ्या, वगनाटके, प्रवासवर्णन, गाणी, पोवाडे लिहिले ते सामाजिक बांधिलकीचे. त्यांच्या जीवनकार्यातून आजच्या समाजाने काय बोध घ्यायचा, ते आजच्या संदर्भात पहायला हवे. आजच्या जीवनाची गती आणि वेग विस्मयकारी आहे. हे विज्ञान-तंत्रज्ञानाचे, नवभांडवली व्यवस्थेचे जग आहे. आधुनिकोत्तर काळाचे चित्रविचित्र पेच आणि मोबाइल स्क्रीनवर विसावलेल्या सेल्फी समाजाचे जग आहे. सामान्यांचे प्रश्न अधांतरी ठेवणारा हा छळणारा काळ आहे. चळवळींचा झपाट्याने संकोच झाला आहे. समाज प्रश्नांविषयी कुणाला फारशी आच नाही. अशावेळी अण्णा भाऊंच्या कार्याचे स्मरण आणि पुनर्भेट आवश्यक आहे.

अण्णा भाऊंनी सामाजिक हस्तक्षेपाच्या भूमिकेला आणि कृतीला महत्त्व दिले. आपल्या वाङ्मयातून झुंजार आणि लढवय्या कामगारांचे जग मांडले. वंचित जगाची संवेदना, अस्मिताहीन समाजाचे दुःख आणि वेदना मांडली. अन्यायाविरुद्ध प्रतिकार करणाऱ्या, बंडखोर माणसांचे जग मांडले. अण्णा भाऊंच्या कथा-कादंबऱ्यांतील नायिका अत्यंत तेजस्वी आणि बाणेदार आहेत. त्यांनी भटक्या समाजाच्या व्यथाकथांचा प्रदेश मराठी साहित्यात आणला. महानगरातील दारिद्र्य आणि पराकोटीच्या भुकेचे व्याकूळ दर्शन घडविले. गावगाड्यातील जातीय विषमतेचे दर्शन घडविले. मराठी साहित्याला परंपरा आणि रुढीविरुद्धचा स्वर दिला.

अण्णा भाऊंच्या शाहिरी काव्याची भूमी ही अमळनेरच्या हुतात्म्यांपासून, मुंबईचा दंगा, प्रतिसरकारचा लढा, पंजाब-दिल्ली दंगा ते स्तालिनग्राडचा पोवाडा अशा स्थानिक ते आंतरराष्ट्रीय राजकारणाची होती. आंबेडकरी विचारविश्वावर त्यांची अढळ श्रद्धा होती. म्हणूनच 'जग बदल घालुनी घाव / सांगून गेले मला भीमराव' अशी परिवर्तनाची कविता त्यांनी लिहिली. 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती श्रमिकांच्या आणि दलितांच्या तळहातावर तरली आहे' हे अण्णा भाऊंनी निक्षून सांगितले. अण्णा भाऊंनी महाराष्ट्राला 'फकिरा'सारखा नवा इतिहासनायक दिला. बुलंद धैर्याची आणि शौर्याची संघर्षरत 'रानवेडी' मराठी माणसे हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता.

त्यामुळे दिगंतात दौडणारे वीरनायक अण्णा भाऊंच्या साहित्यात पदोपदी आहेत. त्यांनी या माणसांच्या स्वातंत्र्याची गाणी गायिली. त्यांच्या सबंध वाङ्मयात महाराष्ट्र प्रेमाची जादुई खेच आहे. त्यांनी नव्या अभंग महाराष्ट्राचे स्वप्न पाहिले, मराठी मुलखाच्या कर्तबगारीचे पोवाडे गायिले. त्यांचा गण देखील प्रथम मायभूच्या चरणासाठी आहे. त्यांच्या साहित्यानेच 'जागा रहा, जागा रहा, रात्र वैऱ्याची आहे' ही जागप्रेरणा दिली.



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त..

अण्णा भाऊंनी त्यांच्या साहित्यातून मुंबईबरोबरच कृष्णा-कोयना-वारणेचा सजीव परिसर रेखाटला आहे. 'तुणतुण्याचे आम्ही धनी/ सदा मैदानी' अशा लोकसमूहगान परंपरेला त्यांनी नव्या काळातील परिवर्तनाचा साज चढवला. शाहिरी वाङ्मयाचे नूतनीकरण केले. तिला प्रबोधनाचा आशय दिला. अण्णा भाऊंनी त्यांच्या साहित्यातून नवी भाषा दिली. ती जशी भावपर आहे तशीच ती लढाऊ प्रतिकाराची आहे.

म्हणून संभ्रम आणि मानवीयतेचा अधिकाधिक संकोच होत असणाऱ्या आजच्या काळात अण्णाभाऊ साठे यांच्या समाजकार्याचे व वाङ्मयाचे स्मरण भारतीय समाजाला आवश्यक आहे. 'आता वळू नका/ रणि पळू नका/ कुणी चळू नका/ बिनी मारायची अजून राहिली' अशा अधुऱ्या स्वप्नाची याद देणाऱ्या या प्रज्ञावंताला वंदन.

rss_marathi@unishivaji.ac.in

01 AUG 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

Estd : 1962
'A++' *Accredited by* NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

• शेतकरी, कष्टकरी, वंचितासाठी कार्य करणारे विद्यापीठ •

• ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचविणारे विद्यापीठ •

• विविध पारंपारिक आणि आधुनिक अभ्यासक्रम राबविणारे ३६ अधिविभाग आणि २८९ संलग्नित महाविद्यालये •

• अद्ययावत सुविधांनी सुसज्ज कँपस • संशोधन क्षेत्रात व्यापक योगदान •

• कमवा आणि शिका व गरजेनुसार काम योजनेद्वारा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे द्वार खुले करणारे विद्यापीठ •

• विद्यापीठ निधीतून गुणवत्ता शिष्यवृत्ती देणारे एकमेव विद्यापीठ •

• सुवर्णमहोत्सवी वर्षात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट स्थापना •

• जैवतंत्रज्ञान व नॅनो तंत्रज्ञान अभ्यासक्रमाची विशेष सोय तसेच अन्न विज्ञान व तंत्रज्ञान विषयक विशेष अभ्यासक्रम •

• सुसज्ज आणि भव्य संगणकीकृत ग्रंथालय •

• विद्यार्थी व पालकांसाठी विशेष अपघात विमा सुरक्षा योजना •

• आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा संकुले •

• देशी – विदेशी विद्यापीठांसोबत सामंजस्य करारद्वारा विशेष शैक्षणिक प्रशिक्षण सुविधा •

• नियोजित वेळेत परीक्षा आणि विहीत वेळेत निकालाची परंपरा •

• जलस्वयंपूर्ण विद्यापीठ, हरित विद्यापीठ •

• www.unishivaji.ac.in •

